# ई - पोलीस पत्रिका

दिनांक १२/११/२०२४ अनु.क्र. २०६

**(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)**

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/परि.पोउपनि/सत्र क्र.१२५/९५९९/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/११/२०२४**

**संदर्भ** :- अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे पत्र क्र. मपोअ/प्रशि-४/ जि.प्रा.प्रशिक्षण-आदेश/खा.अ.प्रशि.पोउपनि/ सत्र क्र.१२५/२०२४/८१८१ नाशिक दिनांक २९/१०/२०२४

**विषय** :-परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक यांचे बारा महिन्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणा बाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये अन्वये सत्र क्र. 125 मधीलखालील परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक यांना अमरावती शहर येथे प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता वाटप करण्यात आले असूनतेत्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास या कार्यालयाचे आस्थापनेवर प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता हजर झाले आहेत.

<u>परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक यांचा प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा कार्यक्रम महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-1, परिशिष्ट-11 (नियम 126) अन्वये खालील प्रमाणे तयार करण्यात आला असून सदर परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पो.स्टे येथे हजर राहून प्रात्यक्षिक प्रशिक्षण पुर्ण करतील.</u>

| **अ.क्र.** | **परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक यांचे नाव** | **प्रात्यक्षिक प्रशिक्षणासहजर झाल्याचा दिनांक** | **प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता नेमणूकीच ठिकाण** |
|---|---|---|---|
| 1 | हितेश विनायक चोपडे | 04/11/2024 म.पूर्व | पो.स्टे. गाडगेनगर |

वरिल परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक यांचा एकते बारा महिन्याचा प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-1 परिशिष्ट-11 (नियम 126) अन्वये दिनांक 05/11/2024 पासून खालील प्रमाणे राहिल.

1) **पहिला महिना - दिनांक 05/11/2024 ते 04/12/2024**

सदर कालावधीत ते पहिल्या महीन्यामध्ये पोलीसठाण्यात पोलीस हवालदार लेखनिक म्हणूनकामकरतील, कर्तव्य नोंदवही, आठवडा डायरी आणि इतर पोलीसठाणे अभिलेख, माहितीपत्रके आणि

कर्मचाऱ्यांची प्रवासभत्ता बिले तयारकरतील ईत्यादीसह पोलीसठाण्याचे लेखाकार्य, पोलीस आणि गुन्हेगार गुप्तवार्ता राजपत्रे आणि तक्रारी घेणे व त्यांची निर्गती यावर विशेष लक्ष देतील.

2) **दुसरा महि□ - दिनांक  05/12/2024  ते  04/01/2025**

गुन्हे प्रतिबंध, निगरानी आणि वाईट चालीच्या इसमांकडून वापरल्या जाणाऱ्या जागा, हॉटेल, धर्मशाळा आणि बाजारासह सार्वजनिक ठिकाणांचे चेकींग, आणि गुन्हे व गुन्हेगार याबाबत गुप्तवार्ता मिळविणे ईत्यादीबाबतची कर्तव्ये शिकण्यासाठी पोलीसठाण्यातील वरिष्ठ पोलीस उपनिरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखालीकामकरतील. सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकांना वारंवार बाहेरील कर्तव्यावर नेमतील.

3) **तिसरा आणि चौथा महि□ - दिनांक  05/01/2025  ते  04/03/2025**

इ□क्वेस्ट आणि किमानसहा प्रकरणांचा तपास करण्यासाठी अधिकाऱ्यास ग्रामिण पोलीसठाण्यात प्रभारी म्हणून नेमावे. शास्त्रीयतपासणीसाठी दुवे कसे करावे आणि स्वतंत्रपणे प्रकरण दैनंदिनीकशी लिहावी हे परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक शिकतील. त्यांनी किमान दोन प्रकरणांच्या चौकशीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या सोबत गेले पाहीजे. आणि त्यांच्या एकतपासणीच्या वेळी हजर राहिले पाहीजे. आणि जमाव नियंत्रण आणि जमान विसर्जनासाठी केली जाणारी पोलीस व्यवस्था पाहीली पाहिजे. राजकारणी, वार्ताहर, पंचायत सदस्य आणि स्थानिक लोकांशी परिचय करुन त्यांनी जनसंपर्काच्या कामात पुढाकार घेतला पाहिजे आणि मनुष्य व्यवस्थापनाशी संबंधीत बाबीमधील योग्य दृष्टीकोनाचा ( Attitude ) विकास, सामाजिक कायदेमंडळाबाबत पोलीसांची भुमिका आणि अहवाल लेखनाचीकला या बाबीवर विशेष लक्ष देतील.

4) **पाचवा महि□ -  दिनांक  05/03/2025  ते  04/04/2025**

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकहे नेमणुकीस असलेल्या पो.स्टे. च्या पोलीस अभियोक्ता हयांचेकडे संलग्न राहतील. परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षककार्यालयीनकाम, चालानाची छाननीकशी करावी आणि खटल्याचेसंक्षिप्त टाचण (Brief ) कसेतयार करावे ईत्यादी बाबी शिकतील आणि एकासेशनकेसचे प्रथम पासून शेवट पर्यंत कामकाज पाहण्यासाठी पोलीस अभियोक्ता यांच्या बरोबर जातील. कामकाजामध्येसाक्षीदारांची उलटतपासणी आणि अभियोग व बचाव पक्षाच्या वकीलाचा युक्तीवाद यांचा अंतर्भाव असावा. परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकांना तुरुंगातील अनोळखीकैदयांच्या मुलाखतीसाठी नेले पाहिजे आणि पुर्व शिक्षाकशा शोधल्या जातात याची माहिती देण्यात यावी.

5) **सहावा महि□-  दिनांक  05/04/2025  ते  04/05/2025**

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकहेखालीलप्रमाणे प्रशिक्षण घेतील.

1) दि. 05/04/2025  ते 14/04/2025 पर्यंत 10 दिवस  विशेष शाखेतीलगोपनिय फाईल, बंदोबस्त आखणी इत्यादी बाबत प्रशिक्षण घेतील.

2) दिनांक 15/04/2025 ते 24/04/2025 पर्यंत 10 दिवस गुन्हेशाखेत संलग्न राहतील. त्यांना गुन्हे शाखेमध्ये चालत असलेल्या आंतरजिल्हा/ आंतराज्य व जिल्हयातीलगुन्हेगारांची माहिती करुन देण्यात येईल. तसेच आर्थिकगुन्हे शाखेत चालत असलेल्या कामकाजाचे प्रशिक्षण घेतील.

3) दिनांक 25/04/2025 ते 04/05/2025 पर्यंत 10 दिवस महीलासेल येथे चालत असलेल्या कामकाजाचे प्रशिक्षण घेतील.

6) **सातवा आणि आठवा महिना - दिनांक 05/05/2025 ते 04/07/2025**

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकहे पूर्वीच्या पोलीसस्टेशनला संलग्न राहतील. या कालावधीमध्येतेकनिष्ठ पोलीसउपनिरीक्षक व जादातपासणी अंमलदार म्हणूनकाम पाहतील. तसेच गुन्हयाचा सखोलपणे तपास करुन पो.स्टे. चे निरनिराळया कामाची माहिती करुन घेतील.

7) **नववा आणि दहावा महिना - दिनांक 05/07/2025 ते 04/09/2025**

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकहे त्यांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरीता नेमून दिलेल्या पोलीसस्टेशनला संलग्न राहतील. तसेच प्रशिक्षणाचे कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकतपासीक अंमलदार म्हणूनकाम पाहणे, रात्रीची गस्त घालणे, बीट डयुटीवर देखरेख ठेवणे, रहदारीशी संलग्न कामे व वाहतुकीबाबतच्या कामाची माहिती करुन घेणे, सराफा (ज्वेलरी बाजार ) चेकिंगकरणे, कायदा व सुव्यवस्था तसेच औद्यागिक समस्या हाताळणे, आणि पांढरपेशेगून्हेगार, तस्कर इत्यादी इसमांना कसे हाताळावे या कामात सहभाग घेतील. जेथेसुधारणा संस्था असतील त्या ठिकाणी भेटी देतील.

8) **अकरावा महिना - दिनांक 05/09/2025 ते 04/10/2025**

हया कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकहे पोलीस आयुक्त यांचे वाचक फौजदार म्हणूनकार्यकरण्यासाठी नियुक्ती, शाखेमध्ये चालणाऱ्या कामकाजाची माहिती करुन घेतीलतसेच पोलीस मुख्यालयालाहोणाऱ्या परेडलाहजर राहतील. तसेच जिल्हा राखीव लाईन व बिनतारी संचाच्या कामकाजाचा अभ्यास करतील.

9) **बारावा महिना - दिनांक 05/10/2025 ते 04/11/2025**

सदरच्या कालावधीमध्ये परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षकहे त्यांना नेमून देण्यात आलेल्या रा.रा.पो. बल गट मध्ये प्रशिक्षणाकरीताहजर राहून जमाव नियंत्रण, जमाव विसर्जन, दरोडा प्रतिबंधक कारवाई आणि हिंसेचा समावेश असलेल्या हालचाली या विशेष संदर्भासह सशस्त्र पोलीसांचेकामकाज शिकतील.

महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-1 परिशिष्ट-11 नियम 126 नुसार 12 महिन्याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचाकार्यक्रमानुसार संबंधीत ठाणेदारांनीत्यांचे पो.स्टेला नेमणूककरण्यात आलेल्या परि. पोउपनि यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देवून, प्रशिक्षण देण्यात आल्याचा दरमहा मासिक अहवाल संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांचे मार्फतीने न चुकता या कार्यालया ससादर करावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### मयत

**०१.पोआअ/पशा-३/दिवगंत गवई/९६३०/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/११/२०२४**

### आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरील श्री. धिरज डिगांबर गवई, पुर्णकालीन सफाई कामगार नेमणुक पोलीस मुख्यालय अमरावती शहर यांचा दि.११/१०/२०२४ रोजी मृत्यू झाल्याने महानगर पालिका, अमरावती यांनी निर्गमित केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे आधारेत्यांचे नांव या आस्थापनेवरून दि.१२/१०/२०२४ चे माध्यान्हापुर्व पासूनकमीकरण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

### वेतन निश्चिती

**१.पोआअ/आस्था-३/सु.वे.नि./पोहवा-१२९६/९४५२/२०२४ अमरावती शहर दिनांक २५/१०/२०२४**

### आदेश (१)

वेतन पडताळणी पथक, अमरावती यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या आक्षेपानुसार पोलीस हवालदार पदामध्ये पदोन्नती झाल्याने वेतनवाढ देता येत नाही फक्त ग्रेड पे लावावा, तसेच संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.सलेवको/वेपप/न.क्र./२०१८/१०/८९९, दि.०५.०३.२०१८ अन्वये कार्यवाही करणेबाबत आक्षेप नोंदविला आहे. त्याअनुषंगाने **पोहवा/१२९६ कैलास रघुसिंग जाधव, नेमणूक पो.स्टे.नागपुरी गेट ,अरमरावती शहर,** यांची सुधारीत वेतन निश्चिती करण्यात आलेली होती.

शासन पत्र गृह विभाग क्र.पोलीस १८२१/प्र.क्र.२२७/पोल५-अ,दिनांक १७.०३.२०२२ अन्व्ये तसेच मा.पोलीस महासंचाक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.पोमस/३०/रा.रा.पो.बल गट क्र.०४/पो.ह/वे.नि./७५/ २०२० दिनांक २८.०३.२०२२ अन्वये पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार पदी पदोन्नती नंतर म.ना.से.(वेतन) नियम ११(१)(ए) प्रमाणे वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहे. त्याअनुषंगाने **पोहवा/१२९६ कैलास रघुसिंग जाधव,** यांची खालील प्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|
| पोलीस नाईक | रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००/- + विशेष वेतन रु.४८०/- |
| पोलीस हवालदार | रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२५००/- + विशेष वेतन रु.५००/- |

| विद्यमान वेतन व दिनांक | | | सुधारीत देय वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | |
| | वेतन बँड | ग्रेड वेतन | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ०१/०७/२०१२ | रु.९५७०/-<br>पोलीस नाईक | रु.२४००/- | ०१/०७/२०१२ | रु.९५७०/-<br>पोलीस नाईक | रु.२४००/- |
| १९/०६/२०१३ | रु. ९५७०+३६०=९९३०/-<br>पोहवा पदावर वेतननिश्चिती नियम १३(अ)(१) प्रमाणे | रु.२५००/- | १९/०६/२०१३ | रु.९५७०/-<br>पोहवा पदावर पदोन्नती देण्यात आल्याने विकल्पानुसार वेतन निश्चिती. | रु.२५००/- |
| | | | ०१/०७/२०१३ | रु. ९५७०+३६०=९९३०/-<br>विद्यमान पोना पदावर नियमीत वेतनवाढ | रु.२४००/- |
| | | | ०१/०७/२०१३ | रु.९९३०+३७०=१०३००/-<br>पोहवा पदावर पदोन्नती झाल्याने विकल्प सादर केला असुन पदोन्नतीच्या पदावर पुर्नवेतननिश्चिती | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१४ | रु.९९३०+३८०=१०३१०/- | रु.२५००/- | ०१/०७/२०१४ | रु.१०३००+३९०=१०६९०/- | रु.२५००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.१०३१०+३९०=१०७००/- | रु.२५००/- | ०१/०७/२०१५ | रु.१०६९०+४००=११०९०/- | रु.२५००/- |

**आदेश (२)**

शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम २०१९ दि.०१.०१.२०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतन संरचना वेतन बँड+ग्रेड वेतन नुसार सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रीक्स) मधील वेतन स्तर मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | पे मॅट्रीक्स |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |
| सहायक पोलीस उपनिरीक्षक | एस-१० | रु.२९२००-९२३००/- |

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती |
|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन १३२०० x २.५७ = रु.३३९२४/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.३४४००/- एस-९ | ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन १३५९० x २.५७ = रु.३४९२६.३/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.३५४००/- एस-९ |
| ०१/०७/२०१६ | रु.३५४००/- एस-९ | ०१/०७/२०१६ | रु.३६५००/- एस-९ |
| ०१/०७/२०१७ | रु.३६५००/- एस-९ | ०१/०७/२०१७ | रु.३७६००/- एस-९ |
| ०१/०७/२०१८ | रु.३७६००/- एस-९ | ०१/०७/२०१८ | रु.३८७००/- एस-९ |
| ०१/०७/२०१९ | रु.३८७००/- एस-९ | ०१/०७/२०१९ | रु.३९९००/- एस-९ |
| ०१/०७/२०२० | रु.३९९००/- एस-९ | ०१/०७/२०२० | रु.४११००/- एस-९ |
| ०१/०७/२०२१ | रु.४११००/- एस-९ | ०१/०७/२०२१ | रु.४२३००/- एस-९ |
| ०१/०७/२०२२ | रु.४२३००/- एस-९ | ०१/०७/२०२२ | रु.४३६००/- एस-९ |
| ०१/०७/२०२३ | रु.४३६००/- एस-९ | ०१/०७/२०२३ | रु.४४९००/- एस-९ |
| ०१/०७/२०२४ | रु.४४९००/- एस-९ | ०१/०७/२०२४ | रु.४६२००/- एस-९ |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतननिश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी वेतनात रोखीन अदा करण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहून करण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचे कडून वसूल करण्यात येईल.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस